दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Scan QR code to visit ... Epaper Portal
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २१२ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१२ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील ;शरद पवार यांचे मोठे वक्तव्य

## 'मोदींचे विचार पचणी पडणे आमच्यासाठी अवघड'

**मुंबई (वृत्तसंस्था)**

पुढील दोन वर्षात अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत समन्वयाने काम करतील किंवा काँग्रेस पक्षात विलीन होतील, असे मत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. एका मुलाखतीमध्ये त्यांनी आगामी काळात प्रादेशिक पक्षांच्या वाटचालीबद्दल मत व्यक्त केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत मी सध्या काही बोलणार नाही. आमच्या सहकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतरच कोणताही निर्णय घेतला जाईल. मात्र, वैचारिक दृष्ट्या शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस हा आमचा पक्ष काँग्रेसच्या जवळचा पक्ष असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. शरद पवार यांनी 'द इंडियन एक्सप्रेस' या दैनिकाला मुलाखत दिली आहे. यावेळी त्यांनी अनेक विषयावर सविस्तर मत व्यक्त केले.

महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार यांच्या वक्तव्याला महत्त्व दिले जाते. त्यातच त्यांनी काँग्रेस पक्षाबाबत मोठे विधान केले आहे. देशातील राजकारणात अनेक राजकीय पक्ष आगामी काळात काँग्रेसमध्ये विलीन होतील, असा अंदाज शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. शरद पवार यांच्या या अंदाजामुळे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देखील काँग्रेसमध्ये विलीन होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मात्र याबाबत देखील शरद पवार यांनी खुलासा केला आहे. सहकाऱ्यांशी चर्चा केल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. आमच्या पक्षाबाबत कोणतेही पाऊल उचलताना किंवा रणनीती ठरवताना सामूहिक पद्धतीने निर्णय घेतला जाईल, असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार हे भारतीय जनता पक्षासोबत एनडीए मध्ये सामील झाले आहेत. त्यांच्यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडणूक चिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे नाव देखील अजित पवार यांना मिळाले आहे. त्यानंतर शरद पवार देखील भाजप सोबत जातील का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र, शरद पवार यांनी भाजप सोबत जाण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या मुलाखतीमध्ये देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जुळवून घेणे किंवा त्यांचे विचार पचणी पडणे हे आमच्यासाठी अवघड असल्याचे शरद पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या याबाबत आता विविध चर्चा रंगल्या आहेत. शरद पवार म्हणाले की, २०२४ च्या निवडणुकीनंतर प्रादेशिक पक्ष जवळ येतील किंवा काही काँग्रेसमध्ये विलीन होतील. पुढील दोन वर्षांत अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसशी अधिक जवळीक साधतील किंवा काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा पर्याय त्यांच्या पक्षासाठी सर्वोत्तम आहे असे त्यांना वाटेल. मला काँग्रेस आणि

आमच्यात काही फरक दिसत नाही वैचारिकदृष्ट्या, आम्ही गांधी, नेहरू विचारसरणीचे आहोत.शरद पवार म्हणाले की, मी आता काहीही बोलत नाही सहकाऱ्यांचा सल्ला घेतल्याशिवाय मी काहीही बोलू नये. वैचारिकदृष्ट्या, आम्ही त्यांच्या (काँग्रेसच्या) जवळ आहोत – रणनीती किंवा पुढील पावले यावर कोणताही निर्णय सामूहिकपणे घेतला जाईल. आम्हाला त्यांच्याशी (नरेंद्र मोदींशी) जुळवून घेणे, त्यांचे विचार पचणी पडणे कठीण आहे. उद्धव देखील समविचारी पक्षांसोबत एकत्र काम करण्याबद्दल सकारात्मक आहेत. मी त्यांची विचारसरणी पाहिली आहे. ती आमच्यासारखीच आहे.शरद पवार म्हणाले की, सध्याच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षाविरुद्ध अंडरकरंट जाणवत आहे. राजकीय पक्षांच्या मोठ्या वर्गाला भाजप आणि मोदी आवडत नाहीत. त्यामुळे ते एकत्र येऊ लागले आहेत. देशातील मूड नरेंद्र मोदींच्या विरोधात आहे. आम्ही गांधी आणि नेहरूंच्या विचारांना अनुसरून सकारात्मक दिशेने वाटचाल करत आहोत.शरद पवार म्हणाले की, २०१९ आणि २०२४ मध्ये आणखी एक फरक होता. आता अनेक तरुण लोक गेल्या वेळेच्या तुलनेत विरोधी पक्षांशी जुळवून घेत आहेत. त्यामुळे परिस्थिती जनता पक्षासारखी होऊ शकते. १९७७ मध्ये विविध पक्ष एकत्र आले. निवडणुका जाहीर झाल्यानंतर जनता पक्षाची स्थापना झाली आणि त्यांनी सरकार स्थापन केले. आता प्रमाणे तेव्हाही विरोधकांनी निवडणुकीपूर्वी पंतप्रधानपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. मोरारजी देसाई यांची नंतर पंतप्रधान म्हणून निवड केली. त्यापूर्वी अेक पक्ष विलीन झाले. जनता पक्ष आला. जयप्रकाश नारायण आणि जे.बी. कृपलानी विविध पक्षांच्या खासदारांशी बोलून हे जुळवून आणले.शरद पवार म्हणाले की, १९७७ मधील मोरारजी देसाईंपेक्षा आज राहुल गांधींना जास्त जण स्वीकारतात. देसाईंपेक्षा त्यांना त्यांच्याच पक्षात मोठा पाठिंबा आहे. त्यांना समविचारी लोकांना एकत्र आणायचे आहे, असे लोकांनाही वाटते. राहुल यांनी अशा अनेक विषयांवर गंभीरपणे चर्चाही केलीय. मोरारजी देसाई अशा पद्धतीने काम करत नसत. माझे एवढेच म्हणणे आहे की, परिस्थितीची मागणी आहे की आपण एकत्र काम करावे. हीच सर्वसाधारण विचारसरणी आहे. आम्ही निवडून आलो तर स्थिर सरकार दिले पाहिजे.शरद पवार म्हणाले की, ज्या लोकांनी मोदींसोबत जाण्यासाठी पक्ष सोडला, त्यांना जनता पसंद करत नाहीय. बारामतीमध्ये आम्ही जिंकत आहोत. पवार कुटुंबीय दरवर्षी दिवाळी एकत्र साजरी करतात. मात्र, राजकीयदृष्ट्या त्यांना परत यायचे असेल, तर आम्ही त्यांना स्वीकारणार नाही.

## कुलरचा शॉक लागून गोंडपिपरी तालुक्यातील ६२ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

कुलरचा शॉक लागून ६२ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गोंडपिपरी तालुक्यातील तारसा बुज येथे दि.(११) शनिवारी दुपारी ३ वाजता दरम्यान घडली.चंद्रकला शंकर अलोने असे मृतक वृध्द महिलेचे नाव आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू झाल्याने उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी कुलरचां मोठ्या प्रमाणात वापर केल्या जातो. घरात काम करताना कुलरला स्पर्श झाला.कुलर मधे विद्युत प्रवाह असल्याने मोठा शॉक लागला व चंद्रकला यांना जीव गमवावा लागला.घटनेची माहिती गोंडपिपरी पोलिसांना देण्यात आली.ठाणेदार रमेश हत्तिगोटे यांच्या

मार्गदर्शनात पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथे पाठविले.चंद्रकला यांच्या पच्यात मुलगा,सून,नातवंडे असा आप्त परिवार असून गावात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

## दुचाकी हायवाचा भीषण अपघात
## अपघातात गोंडपिपरी तालुक्यातील युवकाचा जागीच मृत्यू

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

बल्लारशहा – कोठारी मार्गावर दि ११ शनिवारला सायंकाळी पाच वाजता दरम्यान हायवा दुचाकीचा भीषण अपघात झाला .अपघातात गोंडपिपरी तालुक्यातील लिखितवाडा येथील युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

लिखितवाडा येथील प्रेमदास छत्रपती सरवर वय (२२) व तारडा येथील मयूर नागोसे दोघेही मित्र बल्लारशा येथील बॉटनिकल गार्डन पाहायला गेले असता परत येत असताना कोठारी पुलाजवळ हायवा व एमएच ३४ बी एल ४०३९ दुचाकीची समोरासमोर धडक झाली.धडक जोरदार असल्याने प्रेमदासचा जागीच मृत्यू झाला.मयूर नागोसे हा जखमी झाला.मृतक प्रेमदास याच्या पश्चात आई-वडील दोन बहिणी असा बराच मोठा आप्त परिवार असून कुटुंबातील तो एकुलता एक मुलगा असल्याने गावात शोककळ पसरली आहे.पुढील तपास कोठारीचे ठाणेदार बोरकर करीत आहे.

## जुन्या वैमनस्यातून तरुणाचा खून

### एलसीबीने धामणगाव येथून आरोपीला केली अटक

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या गुंजखेडा गावात गेल्या दोन वर्षांपासून वाळू तस्करीवरून दोन तरुणांमध्ये खडाजंगी सुरू होती. या वादामुळे आपापसात अनेक भांडण झाले. गुरुवारी दुपारी आरोपी ललित इंगळे आणि मयत योगेश काटकर यांच्यात 'माझा ट्रॅक्टर चालक तुमच्या वाहनावर कसा आला' या कारणावरून वाद झाला आणि हा वाद इतका टोकाला गेला की, ललित याने योगेशला लाकडी दांडक्याने मारहाण करून गंभीर जखमी केले. त्याला जखमी केले. या घटनेनंतर योगेशला सावंगी रुग्णालयात दाखल केले असता शुक्रवारी दुपारी त्याचा मृत्यू झाला. ही घटना पुलगाव पोलीस ठाण्यांतर्गत सालफळ संकुलात घडली. घटनेनंतर आरोपी ललित या हत्येला अपघात म्हणत फरार झाला मात्र पोलीस तपासात हा खून असल्याचे समोर आले आहे.

गुंजखेडा गावात राहणारे मृत योगेश काटकर यांच्याकडे ट्रॅक्टर होता. तो गेल्या अनेक वर्षांपासून बांधकाम साहित्याचा पुरवठा करायचा, तसेच आरोपी ललित इंगळे हा देखील गुंजखेडा गावात वाळूचा घाट असल्याने तेथून कधी-कधी रेती काढत असे. कोणत्या ना कोणत्या मुद्द्यावरून वाद व्हायचे. या वादातून दोघांमध्ये घटनेच्या दिवशीही वाहनचालकावरून वाद झाला होता. योगेश काटकर यांचा ट्रॅक्टर आर्वी तहसीलच्या सालफळ डेपोत वाळू भरण्यासाठी गेला होता. दरम्यान, ललित इंगळे याने येऊन योगेशवर लाकडी दांडक्याने जोरदार प्रहार केला, त्यामुळे योगेश गंभीर जखमी झाला. योगेशला घटनास्थळीच सोडून आरोपी ललित पळून गेला. आणि योगेशचा अपघात झाल्याची बातमी सर्वत्र पसरली. यावेळी जखमी योगेशला सावंगी रुग्णालयात दाखल केले असता शुक्रवारी दुपारी त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक नुरुल हसन, पुलगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चौहान, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय गायकवाड, पुलगावचे पोलीस निरीक्षक यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला. घटनेपासून आरोपी ललित फरार होता. ललितच्या तपासासाठी पोलिसांची विविध पथके वेगवेगळ्या ठिकाणी पाठवण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रात्री उशिरा धामणगाव येथून ललितला अटक केली. याप्रकरणी मृताच्या पुतण्याने पुलगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.घटनेनंतर आरोपी ललित घटनास्थळावरून फरार झाला होता. त्यावेळी रस्त्याने जाणाऱ्या एका तरुणाने योगेशचा अपघात झाल्याची माहिती दिली. घटनेपासूनच आरोपींनी या हत्येला अपघात म्हणण्याचा प्रयत्न केला मात्र जुनी वैमनस्य आणि पोलीस तपासातून या प्रकरणाचा पर्दाफाश झाला.आरोपीला पोलिसांनी अटक केली असून न्यायालयातून त्याला चार दिवसाचा पीसीआर मिळालेला आहे.

## रेतीचा अवैद्य उपसा करतांना चार ट्रॅक्टर घेतले ताब्यात

### महसुल विभागाच्या भरारी पथकाच्या कारवाईने रेती व्यवसायीकांचे धाबे दाणाणले

**मूल । प्रतिनिधी**

उमा नदीच्या उश्राळा घाटावर संधी साधुन अवैद्यरित्या रेतीचा उपसा करून गैरमार्गाने विकण्याचा प्रयत्न करत असतांना महसुल विभागाच्या पथकाने चार ट्रॅक्टर ताब्यात घेतल्याने अवैद्य रेती व्यासायीकांचे धाबे दणाणले आहे.

मूल तालुक्यातील मारोडा-पेटगांव मार्गावरील उश्राळा गांवालगत असलेल्या उमानदीच्या घाटावरून मोठ्या प्रमाणांत रेतीचे उत्खनन होत असल्याची गुप्त माहिती महसुल विभागाला मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे रेती उपसा करणा-यांवर आळा घालण्यासाठी नायब तहसिलदार नंदकिशोर कुमरे यांचे नेतृत्वात भरारी पथक तयार करण्यांत आले. तयार करण्यांत आलेल्या भरारी पथकातील मंडल अधिकारी संजय कानकाटे, दिपक गोहणे, तलाठी शंकर

पिदुरकर आणि महेश पेंदोर यांनी आज पहाटे ४ वाजता पासून उश्राळा रेती घाटालगत पाळत ठेवली. पाळतीवर असतांना चार ट्रॅक्टर सदर रेती घाटावर रेतीचा उपसा करण्यासाठी आले. दरम्यान ८.४० वा. चे दरम्यान भरारी पथकाने धाड मारत रेतीने भरलेले तीन आणि रेती भरण्याचे उद्देशाने उभा असलेला एक असे चार ट्रॅक्टर ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या ट्रॅक्टरची अधिक माहिती घेतली असता सदर ट्रॅक्टर मारोडा येथील सचिन गुरनूले, विकास चौधरी, बाळु मंडलवार आणि श्रीकोंडावार यांच्या मालकीचे असल्याचे समजले. भरारी पथकाने ताब्यात घेतलेले ट्रॅक्टर तहसिल कार्यालयात आणले असून नियमानुसार कारवाई करण्यांत येत आहे. ताब्यात घेतलेल्या ट्रॅक्टर पैकी दोन ट्रॅक्टरवर नंबर प्लेट नसुन बांधकाम पुर्ण करण्यासाठी अनेकांना रेतीची आवश्यकता असल्याची संधी साधुन तालुक्यातील अनेक मंडळी रेतीचा अवैद्य व्यवसायात गुंतले आहेत. हे विशेष.

शासनाने रेती घाटांचा नियमानुसार लिलाव केला असता तर बेरोजगार युवक अधिकृत रेतीघाट धारकांकडून शासकिय दरानुसार रेती खरेदी करून गरजवंताना रेती उपलब्ध करून दिले असते. रोजगार म्हणून अनेक युवकांनी रेती व्यवसायाची निवड केली असून बँक आणि खाजगी विक्रेत्यांकडून ट्रक आणि ट्रॅक्टर खरेदी केले आहेत. याचे हप्ते त्यांना नियमित भरावे लागत आहे. परंतू शासनाने रेती घाटांचा लिलाव न केल्यामूळे असंख्य बेरोजगार युवक अडचणीत सापडले असुन कुटूंबाच्या उदरनिर्वाह आणि कर्जाचे हप्ते भरण्याकरीता नाईलाजास्तव रेतीचा अवैद्य व्यवसाय करीत आहेत. याला शासन जबाबदार आहे.

**संतोषसिंह रावत, अध्यक्ष चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक**

## उसने पैसे घेणे जीवावर बेतले
## पैशाचा वादातून दारूच्या नशेत मित्रानेच केला मित्राचा खून

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दीड हजार रुपये घेतल्याच्या कारणावरून वाद करून मित्राने आपल्या मित्रालाच जमिनीवर निपचित पडेपर्यंत लाथाबुक्क्याने मारहाण केली अन पसार झाला. पोलिसांनी त्याला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. ही घटना घुग्घुस येथील तलावाजवळ असलेल्या देशी दारू भट्टीसमोर शनिवारी (दि. ११) सायंकाळी ६.३० वाजेदरम्यान घडली.

दारूच्या नशेत बेभान होत, त्यानंतर दीड हजार रुपया वरून दोघांमध्ये वाद झाला, आणि त्या दारूच्या नशेत आपण मित्राला मारहाण करीत आहो याचे भान संतोष ला नव्हते.सूरज जयस्वाल (४०, रा. घुग्घुस) असे मृतकाचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी सागर ऊर्फ संतोष कुंडावार (३६, रा. घुग्घुस) याला अवघ्या अर्ध्या तासात बेड्या ठोकल्याची माहिती सुधाकर यादव यांनी दिली. सूरज व संतोष हे दोघे मित्र आहे. शनिवारी घुग्घुसमधील भट्टीसमोर ६.३० वाजताच्या दरम्यान ते दोघे एकत्र आले. यावेळी दीड हजार रुपये घेतल्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. यावेळी सूरजला संतोषने लाथा-बुक्क्यानी

मारहाण केली. दरम्यान, सूरज जागेवर निपचित पडताच संतोष घटनास्थळावरून पसार झाला.याबाबतची माहिती घुग्घुस पोलिसांना मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घुग्घुस येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पोलिसांनी लगेच आपल्या तपासाची चक्रे गतीने फिरवून सागर ऊर्फ संतोष कुंडावार याला अटक केली.घटनेची माहिती पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक रिना जनबंधू यांना मिळताच त्यांनी लगेच घटनास्थळ गाठले. यासोबतच चंद्रपूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुधाकर यादव यांनीसुद्धा घटनास्थळ गाठले. पंचनामा करून लगेच आरोपीला अटक केली. घटनेचा पुढील तपास घुग्घुस पोलिस करीत आहेत.

# परिचर्याशास्त्रास नवी दिशा प्राप्त!

**फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनतास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप– कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. रोचक माहितीपूर्ण असा श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख... संपादक.**

संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

चीनच्या वुहान शहरापासून वाढत गेलेल्या कोरोना विषाणूच्या प्राणघातक संसर्गाने जगभर धुमाकूळ घातला. भारतातही कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोरोनाच्या मोठ्या लढ्यात डॉक्टर, परिचारिका, पोलीस दोन वर्षांपासून चोख भूमिका बजावत आहेत. जागतिक स्तरावर मातृदिन, पितृदिन आणि आणखी काही दिवस साजरे केले जातात. तसेच रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १२ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९७१मध्ये आंतराष्ट्रीय परिचारिका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आधुनिक नर्सिंगच्या फाऊंडर लेडी फ्लोरेन्स नाईटिंगल यांचा जन्म ज्या तारखेला झाला, तो दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून घोषित करण्यात आला. तेव्हापासून अख्ख्या विश्वाच्या पाठीवर १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनतास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप– कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. थोडक्यात त्यांची माहिती–

फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म १२ मे १८२० रोजी झाला. त्या अग्रगण्य परिचारिका, लेखक व संख्याशास्त्रज्ञ होत्या. इ.स.१८५३ साली झालेल्या क्राइमियन युद्धादरम्यान जखमी सैनिकांची सुश्रुषा केल्याबद्दल त्यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांना लेडी विथ द लॅम्प असेही म्हणत. अतिशय सुखवस्तू घराण्यात जन्म होऊनही परमेश्वराने आपल्याला भूतदयेसाठी व मानवतेची सेवा करण्यासाठीच जन्माला घातले, या भावनेने त्या प्रेरित झाल्या होत्या. रेडक्रॉसचे संस्थापक हेन्री ड्युनेन्ट यांनी त्यांना लेडी विथ द लॅम्प ही उपाधी दिली. त्यांच्या हातातील कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोनातून रुग्णसेवा केल्यामुळेच परिचर्याशास्त्राला नवीन दिशा प्राप्त झाली. त्यांच्या सन्मानाप्रित्यर्थ १२ मे हा त्यांचा जन्मदिवस जगभरामध्ये जागतिक परिचर्यादिन म्हणून साजरा केला जातो. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना बालपणापासूनच गणितात गती होती. आकडेवारी आलेखांच्या माध्यमातून दृश्य सादरीकरण करणे, हे त्याकाळात फारसे प्रचलित नव्हते. विल्यम प्लेफेअर यांनी विकसित केलेल्या पाय आकृतीसारख्या आलेखांचा त्यांनी परिणामकारकरित्या वापर केला. नाइटिंगेल यांचे संख्या शास्त्रातील सर्वात महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी विकसित केलेली ध्रुवीय क्षेत्र आकृती होय. या प्रकारच्या आलेखास नाइटिंगेल रोझ प्लॅट असेही म्हटले जाते. स्वतः काम करीत असलेल्या लष्करी रुग्णालयातील दर महिन्यातील मृत्यूंची संख्या व कारणे यांचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी या आकृतीचा वापर केला. एरवी आकडेवारीच्या जंजाळामुळे संसद सदस्य आणि सरकारी अधिकारी यांच्याकडून असे अहवाल दुर्लक्षित राहात असत. परंतु नाइटिंगेल यांनी केलेल्या प्रभावशाली दृश्य सादरीकरणामुळे सैनिकांसाठीच्या वैद्यकीय सुविधा किती अपुऱ्या आहेत? याची जाणीव होऊन या वैद्यकीय सुविधांचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले. या सर्व कामामुळे रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीच्या पहिल्या महिला सभासद होण्याचा सन्मान सन १८५९ साली नाइटिंगेल यांना प्राप्त झाला. पुढे अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनने देखील त्यांना सन्माननीय सदस्यत्व बहाल केले गेले. त्यांचे दि.१३ ऑगस्ट १९१० रोजी दुःखद निधन झाले.

परिचारिकांना आजही अनेक समस्या भेडसावत आहेत. तरीही त्या रुग्णसेवेला प्राधान्यक्रम देत त्या रुग्णांची सेवा करीत असतात. हजारो परिचारिका वैद्यकीय क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. मध्यंतरी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनीही परिचारिकेचा गणवेश परिधान करून नायर रुग्णालयाला भेट दिली होती. किशोरी पेडणेकर यांनी काही वर्षांपूर्वी नायर रुग्णालयात परिचारिका म्हणून आपली सेवा बजावली होती. कोविड युद्धात स्वतः उतरून त्यांनी एकप्रकारे परिचारिकांना मानवंदना दिल्याचे सांगितले जाते. कोणत्याही रुग्णालयातील रुग्ण हा डॉक्टरांपेक्षा अधिक काळ परिचारिकेच्या देखरेखीखाली असतो. रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांची त्या अहोरात्र सेवा करीत असतात. रुग्णाला सकारात्मकता प्रदान करणे व त्यांना आनंद देणे हे महत्त्वाचे कार्य त्या करीत असतात. आताच्या घडीलाही कोरोनासारख्या महाभयंकर व जीवघेण्या संकटकाळात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. कुटुंबांची, मुलांची, प्रसंगी आपल्या जीवाची पर्वा न करता दिवस–रात्र झटून त्या आपली सेवा अत्यंत चोखपणे बजावत असतात. अनेक रुग्णालयातील परिचारिका तर गेले कित्येक दिवस आपल्या घरीदेखील गेल्या नाहीत. वैद्यकीय क्षेत्रात त्यांचे योगदान अमूल्य असेच आहे. त्यांच्याशिवाय वैद्यकीय क्षेत्र पूर्णत्वास जाऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रातील रुग्णसेवेत प्रमुख भूमिका बजावणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जागतिक परिचारिका दिन साजरा केला जातो. कोरोना संकटकाळात त्या खऱ्या योद्धा बनून अहोरात्र रुग्णसेवा करत आहेत. त्यांच्या कार्याला माझा या शब्दप्रपंचाने सलाम!

!! रुग्णसेवेत सर्वस्व पणाला लावणाऱ्या जगातील समस्त सिस्टर्सना कोटी कोटी सॅल्यूट !!

# मोठयाचं पोरगं एवढीच भाजपा उमेदवाराची गुणवत्ता;बाळासाहेब थोरात यांचे टीकास्त्र

**तिसगांव । प्रतिनिधी**

समोरच्या उमेदवाराने पाच वर्षाच्या खासदारकीच्या कार्यकाळात काय काम केले ? किती फिरले ? किती वेळा मतदारसंघात आले ? कोणते प्रश्न सोडविले? त्यांनी काहीच काम केले नाही. मोठयाचं पोरगं आहे, पैसा भरपूर आहे, सत्तेची ताकद आहे म्हणून खासदार व्हायचंय ! यापेक्षा कोणतीही गुणवत्ता त्यांच्याकडे नाही ही वस्तूस्थिती असल्याचे सांगत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी खा. डॉ. सुजय विखे यांचे नाव न घेता जोरदार टीकाश्र सोडले.

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ तिसगांव येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेमध्ये थोरात हे बोलत होते. यावेळी उमेदवार नीलेश लंके यांच्यासह आ. प्राजक्त तनपुरे, प्रताप ढाकणे, नसिर शेख, मुन्ना तांबोळी, शिवशंकर राजळे, रफीक शेख, इलियास शेख, संजय मोहिते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या सभेला तिसगांवकरांनी मोठा प्रतिसाद दिला.

यावेळी बोलताना माजी मंत्री थोरात पुढे म्हणाले, तुमच्या पुढे दोन उमेदवार आहेत. एकाकडे खुप धनसंपत्ती आहे, सत्ता आहे तर दुसरा आहे तो सर्वसामान्य कुटूंबातला कर्तुत्ववान उमेदवार आहे. साध्या कुटूंबातून आलेल्या कर्तृत्ववान उमेदवाराला मतदान केले पाहिजे असा माझा तुम्हाला आग्रह राहील. गरीबाच्या पोराला संधी मिळणे सोपे नसते मात्र नीलेश लंके यांनी ती मिळविली आहे. कर्तुत्व दाखविले असल्याचे थोरात म्हणाले. थोरात पुढे म्हणाले, लोकांचे प्रश्न सोडविता सोडविता नीलेश लंके आमदार झाले. कोरोना संकटात राज्यात, देशात भयानक परिस्थिती होती. कोणी एकमेकांच्या जवळ जात नव्हते. अशा वेळी लंके यांनी कोरोना रूग्णांसाठी कोव्हीड सेंटर सुरू केले. हजारो रूग्णांना जीवदान दिले. रूग्णांजवळ बसून त्यांना धीर दिला. हे धाडस लंके हेच करू शकतात. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याची ओढ त्यांच्याकडे असून एक आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून मोठी लोकप्रियता त्यांनी मिळविली आहे. दक्षिण नगर मतदारसंघातील तरूणांशी असलेला त्यांचा संपर्क पाहता पुढचा खासदारकीचा उमेदवार कोण असा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी लंके यांचेच नाव घेतले जायचे असे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. एकीकडे निर्यात बंदी उठविली म्हणता, तर दुसरीकडे कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकरी रस्त्यावर आले आहेत. आंदोलने सुरू झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. कांद्याची निर्यातबंदी फक्त गुजरातकरता उठविली आपल्याकरता नसल्याचे सांगत थोरात यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. नीलेश लंके यांच्या उमेदवारीमुळे तरूणांमध्ये स्फुर्ती पहावयास मिळत आहे. कोठेही गेले तरी हजारो लोक त्यांच्या स्वागताला उपस्थित असतात. त्यामुळे लंके यांचा विजय मोठा होणार आहे. पुढाऱ्यांच्या काही अडचणी असतील, तुम्ही पुढाऱ्यांकडे लक्ष देऊ नका. लंके यांनाच मतदान करायचे हे ठरवून टाका असे थोरात म्हणाले.

नीलेश लंके ज्यावेळी लोकसभेत जातील त्यावेळी खासदारांमध्ये कोण आहेत नीलेश लंके हे पाहण्याची उत्सुकता असेल. इतक्या मोठया धनदांडग्या उमेदवाराविरोधात कसे निवडूण आले ? किती मतांनी विजय झाला ? याचीही विचारणा होईल, त्यासाठी मताधिक्क्याचा आकडाही दोन लाखांपेक्षा अधिक हवा असे आवाहन मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

नगर–पाथर्डी रस्ता झाल्यानंतर ते कामाच्या ठिकाणी गेले. झाडाखाली जेवायला बसले. मात्र झाडाखाली आम्हीच बसू जाणं !हेलीकॉप्टरवाले कधी झाडाखाली जेवत नाहीत. कुणी कुणाचे काम करू शकत नाही. नीलेश लंके रोडवरही बसू शकतो, वाहतूकीची कोंडी दुर करू शकतो. ते तुम्हाला जमणार नाही. त्यांना फक्त फुकटचे श्रेय घेण्याची सवय लागली असल्याचा टोला लंके यांनी लगावला. महाविकास आघाडीचे सरकार आले आणि तीन वर्षे या भागाला वांबोरी चारीचे पाणी आले. महायुतीचे सरकार आल्यानंतर मात्र हे पाणी बंद झाले. पुढचे सरकार महाविकास आघाडीचेच येणार आहे. त्यामुळे या निवडणूकीत तुम्हाला परिवर्तन करावे लागणार आहे. तिसगाव, ता. पाथर्डी येथे झालेल्या प्रचार सभेत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मार्गदर्शन केले.

# शिर्डी लोकसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## पात्र मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे–बाळासाहेब कोळेकर

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी लोकसभा मतदारसंघात सोमवार १३ मे रोजी मतदान होत असून सर्व घटकातील पात्र मतदारांनी आपली जबाबदारी, कर्तव्य समजून या लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे; आपल्या परिचयातील सर्व मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले आहे.

शिर्डी लोकसभा मतदारसंघात अकोले, संगमनेर, शिर्डी , कोपरगाव , श्रीरामपूर व नेवासा या विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. या लोकसभा मतदारसंघाकरीता होणारी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया नि:पक्ष, निर्भय, निकोप आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. शिर्डी लोकसभेच्या १७०८ मतदान केंद्रावर १३ मे रोजी सकाळी ७.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेदरम्यान मतदान पार पडणार आहे. प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, दिव्यांगासाठी रॅम्प, व्हिलचेअर, सुरक्षा व्यवस्था, उष्माघातापासून संरक्षणासाठी औषधे, बैठक व्यवस्था, सावलीसाठी मंडप उभारणी, तसेच पाळणाघर आदी सुविधेसोबतच इतर तांत्रिक बाबींची पूर्तताही करण्यात आली आहे. पत्र्याचे छत असलेल्या मतदान केंद्रावरील छतांवर गवताचे पाचट टाकण्यात येणार आहे. वादळी वाऱ्याने हे पाचट उडून जावू नये. यासाठी यांची बांधणी पक्की करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वादळी–वारा व पावसाची शक्यता लक्षात घेता वॉटरप्रूफ मंडप उभारण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. मतदान साहित्याबरोबर मेडीकल कीट ही उपलब्ध करून दिला जाणार आहे. मतदान अधिकारी–कर्मचारी, पोलीस कर्मचारी यांची निवासाची व माफक दरात भोजनाची मतदान केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे. निवासावेळी कर्मचाऱ्यांची व्यवस्थित झोप व्हावी, यासाठी मच्छर पासून संरक्षणासाठी डास कीट दिले जाणार आहेत. फिरते वैद्यकीय पथके कार्यरत राहणार आहेत. अशी माहिती श्री. कोळेकर यांनी दिली. शिर्डी लोकसभांतर्गत विधानसभा मतदारसंघ निहाय वाहतूक आराखडा तयार करण्यात आला आहे. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचारी, पोलीस यांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी लागणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्यात आले आहे. मतदान यंत्रांच्या वाहतुकीकरिता १५६ सेक्टरनिहाय ३१२ रूट तयार करण्यात आलेले आहेत. २११ एसटी बसेस, ३८७ जीप, ५१ मिनी बस व ९ कुझर वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान झाल्यानंतर अहमदनगर येथे ईव्हीएम मशिन घेऊन जाण्यासाठी १८ कंटेनर वाहन असणार आहेत. शिर्डीतील १७०८ मतदान केंद्रांसाठी ८ हजार ५३० मतदान अधिकारी, कर्मचारी व ८६० राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे . ५० सूक्ष्म निरीक्षक देखील नियुक्त करण्यात आले आहेत. सेक्टर अधिकाऱ्याला लोकसभेच्या निवडणुकीसाठी क्षेत्रीय दंडाधिकारी दर्जा देण्यात आला आहे. प्रत्येक मतदान केंद्राबाहेर मतदारांना मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत. मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान केंद्रावर शस्त्रधारी पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात आला आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघातील सर्व सहा विधानसभा मतदारसंघांतील मतदान यंत्रांची सिलिंग पूर्ण झाली आहे. अभिरूप मतदान प्रक्रियाही यशस्वी झाली आहे. १७०८ मतदान केंद्रांसाठी प्रत्येकी १ कंट्रोल युनिट, २ बॅलेट युनिट, १ व्हीव्हीपॅट यंत्रांची उपलब्धता आहे. एकूण कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट यंत्रांच्या २० टक्के प्रमाणात व एकूण व्हीव्हीपॅट यंत्रांच्या ३० टक्के प्रमाणात यंत्रे राखीव ठेवण्यात आले आहेत. मतदान यंत्रांत ऐनवेळी काही तांत्रिक बिघाड झाल्यास यंत्रे तात्काळ दुरूस्त करण्यासाठी प्रत्येक तहसीलमध्ये २ अभियंता नियुक्त करण्यात आले आहेत. शिर्डी लोकसभा कार्यक्षेत्रात १६ लाख ७७ हजार ३३५ मतदार असून यामध्ये ८ लाख ६४ हजार ५७३ पुरूष मतदार, ८ लाख १२ हजार ६८४ महिला मतदार आणि ७८ तृतीयपंथी मतदार आहेत. शिर्डी लोकसभेत २२ मतदान केंद्र नेटवर्क कनेक्टिव्हिटी नसलेल्या दुर्गम भागात आहेत. तेथे रनरची व्यवस्था असणार आहे. तांत्रिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या मतदान केंद्रावर सर्वांतोपरी दक्षता घेण्यात येत आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघात १२ आदर्श मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. प्रत्येकी ६ महिला, दिव्यांग व युवक मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. शिर्डी लोकसभेतील १७०८ मतदान केंद्रांपैकी ८५४ मतदान केंद्रावर लाईव्ह वेब कॉस्टींग केली जाणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील १२ मोठ्या पडद्यावर (स्क्रीनवर) ही लाईव्ह कॉस्टींग पाहता येणार आहे. त्याद्वारे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मतदान केंद्रावरील हालाचालींवर बारीक लक्ष असणार आहे. तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात पण मतदान केंद्राचे लाईव्ह कॉस्टींगद्वारे हालचालींवर बारीक लक्ष ठेवले जाणार आहे. शिर्डी लोकसभेतील सहा विधानसभा मतदारसंघात १२ मे रोजी सहायक निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत ईव्हीएम मशिनसह मतदान साहित्य वाटप केले जाणार आहे. अकोले विधानसभा मतदारसंघाचे साहित्य वाटप अकोले तहसील कार्यालयात, संगमनेर विधानसभेचे भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल (संगमनेर), शिर्डी विधानसभेचे राहाता तहसील कार्यालय, कोपरगाव मतदारसंघाचे सेवा निकेतन कॉन्व्हेंट स्कूल, श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे श्रीरामपूर तहसील इमारतीत व नेवासा विधानसभा मतदारसंघाचे साहित्य वाटप न्यू ग्रेन गोडाऊन, मिंकदपूर, नेवासा फाटा येथे होणार आहे. मतदान साहित्य प्राप्त करून घेतल्यानंतर मतदान कर्मचारी मतदान केंद्रावर मुक्काम करणार आहेत. मतदानाच्या दिवशी पहाटे ५.३० वाजता उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधींच्या उपस्थित मॉक पोल घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मतदारांनी मतदान केंद्रामध्ये भ्रमणध्वनी घेऊन जावू नये. मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता येत्या १३ मे रोजी आपला मताचा पवित्र हक्क बजावून लोकशाहीच्या सक्षमीकरणात योगदान द्यावे, असे आवाहनही श्री. कोळेकर यांनी केले आहे.

# सात गावांच्या पिण्याच्या पाण्यांच्या योजना अवलंबून असलेल्या गोविंदसागर जलाशयात सध्या सुरू असलेल्या आवर्तनातून पाणी सोडण्याची मागणी

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

श्रीरामपूर तालुक्याच्या पुर्वभागाला वरदान ठरलेल्या गोविंद सागरने तळ गाठल्याने त्यावर अवलंबून असलेल्या परीसरातील सात गावांच्या पाण्याच्या योजना ठप्प होण्याच्या मार्गावर असल्याने पाटबंधारे खात्याने सध्या सुरू असलेल्या आवर्तनातून टाकळीभान टेलटँक अर्थात गोविंदसागर भरण्याची गरज असल्याने या गोविंदसागर मध्ये पाणी सोडण्याची मागणी परीसरातील शेतकर्यांसह नागरीकांकडून केली जात आहे. टाकळीभान टेलटँक येथून टाकळीभान, भोकर, खोकर, मातापूर, भेर्डापूर, वांगी व खिर्डी या गावांच्या पाणी पुरवठा योजनांच्या विहीरीतून नळपाणी पुरवठा योजना सुरू आहे. टाकळीभान टेलटँक अर्थात गोविंद सागर या जलाशयामुळे परीसरातील टाकळीभान, भोकर, खोकर, कारेगाव, मातापूर, गुजरवाडी, वांगी, खिर्डी व कारवाडी आदि गावांच्या परीसरातील शेतकर्यांसाठी वरदान ठरलेला आहे. त्यावरच या परीसरातील बहुतांशी शेती पिकते. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात या गोविंदसागर मध्ये ओव्हर फ्लोने पाणी सोडण्यात येवून तो भरण्यात आला. अनेक राजकीय नेत्यांनी येथे जलपुजन केले परंतू नेहमी प्रमाणे पाटबंधारे विभागाने काही दिवसानंतर या जलाशयातून टाकळीभान व घोगरगाव परीसरातील शेतीसाठीची दोन आवर्तन सोडली. प्रत्यक्षात पाटबंधारे विभागाने या शेतकर्यांना गोविंद सागर मधून आवर्तन सोडून पाणी देण्याऐवजी भंडारदरा धरणातून कालव्याद्वारे येणार्या पाण्यातून या शेतकर्यांना पाणी देणं आवश्यक होतं. तसे झाले असते तर गोविंदसागरमध्ये आज पुरेसा पाणीसाठा शिल्लक राहीला असता पर्यायाने या परीसरातील अनेक विहीरींचा तळ दिसला नसता लाभधारक शेतकर्यांसह वरील सात गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ही ऐरणीवर आला नसता. प्रत्यक्षात गोविंद सागर भरल्यानंतर येथील पाणी पिण्यासाठी आरक्षीत करण्याची गरज आहे. येथे वितरिका द्वारे शेतकर्यांना पाणी देण्याऐवजी संबधीत लाभ धारक शेतकर्यांना पाटबंधारे विभागाने भंडारदर्याच्या कालव्याच्या आवर्तनातून पाणी देवून गोविंद सागरचा पाणी साठा पिण्यासाठी आरक्षीत करावा अशी मागणी केली जाते परंतू पाटंबधारे विभाग या मागणीकडे नेहमीच दुर्लक्ष करून परीसरावर व पाणीपुरवठा योजना अवलंबून असलेल्या गावांवर अन्याय करत आहे, त्यामुळे केवळ पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षीतपणा व हेकेखोरपणामुळे परीसरातील शेतकर्यांसह लाभधारक पाणी पुरवठा योजनांच्या गावावर अन्याय होत आहे. सध्या सर्वत्र पाणी टंचाई आहे, दररोजच्या कडक उन्हामुळे व वार्यामुळे परीसरातील विहीरींची पाणी पातळी दररोज खालवत असल्याने परीसरातील शेतकर्यांच्या तोंडचे पाणी पळू लागले आहे. त्याच बरोबर शासनाचा कोट्यावधीचा निधी खर्चून पिण्याच्या पाण्याच्या योजना असलेल्या टाकळीभान, भोकर, खोकर, मातापूर, भेर्डापूर, वांगी व खिर्डी या गावांना पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. ज्या प्रमाणे प्रशासनाने व पाटबंधारे विभागाने नदीकाठच्या शेतकर्यांचा व नागरीकांच्या पाणी टंचाईचा विचार करून अकोले पासून नेवासा पर्यंतचे केटी वेअर मध्ये पाणी साठवून पावसाचे आगमन उशीराने झाले तरी नदी काठच्या गावांना तीतकीसी पाणी टंचाई भासून नये व आजचा हि प्रश्न सोडविला त्या प्रमाणे या परीसरातील टाकळीभान, भोकर, खोकर, कारेगाव, मातापूर, चारी क्र. १२, वांगी, खिर्डी, गुजरवाडी, कारवाडी आदि गावांना याचा लाभ होईल त्याच बरोबर त्या सात गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल त्यामुळे भंडारदरा धरणाच्या सध्या सुरू असलेल्या आवर्तनातून गोविंदसागर या जलाशयात पाणी सोडण्याची मागणी लाभधारक गावांतील नागरीकांकडून केली जात आहे.

# उद्धव ठाकरे वोट जिहादचे आका- मुंबई भाजपा अध्यक्ष आ.आशिष शेलार

## दक्षिण मुंबईच्या महायुतीच्या उमेदवार यामिनीताई जाधव यांच्या प्रचारार्थ कार्यकर्ता मेळावा

**मुंबई । प्रतिनिधी**

इंडिया आघाडीकडून एक नवीन पद्धतीचा जिहाद सुरू झाला आहे. पूर्वी आपण लँड जिहाद पाहिला, लव जिहाद, भाषा जिहाद बघितला आता वोट जिहाद मुंबईत मोठ्याप्रमाणात सुरू झाला आहे. या वोट जिहादचा प्रमुख आका कोण असेल तर ते उद्धव ठाकरे आहेत अशी घणाघाती टीका

मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ड. आशिष शेलार यांनी केली. अश्या देशविरोधी शक्तीच्या मांडीला मांडी लावून उद्धव ठाकरे बसत आहेत म्हणून प्रत्येक राष्ट्रभक्ताचं मत हिरवी चादर पांघरणाऱ्या उद्धव ठाकरेंच्या विरोधात पडले पाहिजे असेही आवाहन मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ड. आशिष शेलार यांनी यावेळी केले.दक्षिण मुंबईच्या महायुतीच्या उमेदवार यामिनीताई जाधव यांच्या प्रचारार्थ परेलच्या शिरोडकर हायस्कूलमध्ये आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते आज बोलत होते. महायुतीच्या महाविजयासाठी एकजुटीने काम करण्याचे तसेच मोदी सरकारने केलेली विकासाची कामे घेऊन लोकांमध्ये जाऊन दमदार प्रचार करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. यावेळी कॅबिनेट मंत्री ड.मंगलप्रभात लोढा, महामंत्री संजय उपाध्याय, माजी स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते.मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ड. आशिष शेलार म्हणाले, आम्ही कुठल्या धर्माच्या भाषेच्या विरोधात नाही. १९५० ते २०१४ पर्यंत बहुतांश काँग्रेस राजवटीच्या कार्यकाळात जेव्हा मुस्लिमांची लोकसंख्या पाच टक्क्यांनी वाढते तेव्हा हिंदुंची संख्या ७.८ टक्क्यांनी कमी होते. यासाठी वोट जिहादच्या विरोधात लढताना आपल्याला आपले राष्ट्र टिकवायचे आहे. आपला हिंदुस्तान ताठ मानेने उभा करायचा आहे. हिंदू एकत्र आला तर यांना त्रास होतो त्यामुळे हिंदू विरोधी सर्वजण एकत्र आले आहेत. गेले दोन ते तीन दिवस मराठी आणि गुजराती वाद पेटविण्याचा प्रयत्न विरोधक करत आहेत. मराठी आणि गुजराती बांधव दुधात साखर याप्रमाणे मुंबईत राहत आहेत. मराठी भाषा आणि मराठी माणसाचा अपमान भाजप होवू देणार नाही आणि गुजराती माणसांवर अन्यायही चालू देणार नाही असेही मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ड. आशिष शेलार यावेळी म्हणाले.त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.. उबाठा गटालाखूप माज आला आहे, मस्ती चढली आहे. अहंकार आला आहे. हा माज स्वत:च्या जीवावर असता तर ठीक होते पण तोही नाही. उद्धव ठाकरे

यांचं प्रत्येक भाषण मी पाहतो. विरोधक काय करतात ते पाहिलं पाहिजे. उद्धव ठाकरे यांना कुणीही विचारत, कुणाच्या मनात प्रश्नही नाही तरीही ते सारखं म्हणतात मी, मर्दांचा पक्ष आहे. आमच्या मनात त्यांच्याबद्दल काही शंका नाही. स्वतःच्या मर्दुमकिवर अरविंद सावंत यांनी माज, मस्ती अहंकार केला तर समजू शकतो. ते इतके घाबरले आहेत. त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. यांच्या समर्थकाने सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. त्यात लिहिलं ज्या मशीनवर तुम्हाला कमळ दिसणार आहे तिकडे तुम्हाला मशाल बटन दाबायचे आहे. अशा प्रकारचा अपप्रचार केला जात आहे. उबाठा गटाला कोणी मत द्यायला तयार नाही म्हणून ही खोटं पसरवत आहेत. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अटल बिहारी वाजपेयी यांनी केलेली युती पक्की राहील. जिकडे कमळ आहे तिकडे धनुष्यबाण राहील. त्यामुळे धनुष्यबाण हे निशाणी असणारे बटन आपल्याला दाबायचे आहे असेही मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ड. आशिष शेलार म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात आपल्याला एक आव्हान केले आहे त्यावर करताना आपल्याला सजग राहायला सांगितले आहे. डोळ्यात तेल घालून लक्ष द्यायला सांगितले आहे. गेल्या महिन्यात उद्धव ठाकरे यांनी माहीमच्या काही लोकांना शिवसेना भवनात बोलावलं. एका विशिष्ट रंगाच्या लोकांना बोलावून हिरवी चादर घालून त्यांना बसवलं आणि उद्धव ठाकरे त्यांना म्हणाले, हो गया, झालं गेलं विसरून जा...विसरून जा म्हणजे काय? त्या माहीममध्ये याकूब मेमनने त्याच्या स्कूटरमध्ये भरलेला आरडीएक्स मुंबईतील बारा ठिकाणी ठेवून बॉम्बस्फोट करून मुंबईकरांचा बळी घेतला. त्या याकूब मेमनच दहशतवादी कृत्य उद्धव ठाकरे हिंदूंना आणि मराठी माणसाला विसरायला लावत आहेत. विसरा म्हणून सांगत आहेत हा वोट जिहाद आहे. ड. उज्ज्वल निकम यांनी कसाबच्या विरोधातील लढाई लढली. २६/११ दहशतवादी हल्ल्यांमध्ये बळी गेलेल्या हुतात्म्यांचा अपमान करण्याचे काम उद्धव ठाकरे यांच्यासोबत असलेले काँग्रेस करत आहे. काँग्रेसचे वडेट्टीवार सांगतात, कसाबने गोळीबार केलाच नाही. कसाबने मुंबईवर हल्ला केला नाही. कसाबने १६७ निष्पाप मुंबईकरांचे प्राण घेतले नाहीत. कसाबच्या गोळीने आमचे वीर अधिकारी मारले गेले नाहीत. एका विशिष्ट वर्गाच्या मतासाठी उद्धव ठाकरे कुर्निसात करत आहेत. हा वोट जिहाद मुंबईत पसरवण्याचे काम उद्धव ठाकरे करत आहेत. उबाठाचे उमेदवार अमोल किर्तीकर यांना मते मिळविण्यासाठी १९९३ च्या दंगलीतील आरोपी इकबाल मुसा याची मदत घेतली आहे. ज्याला दहा वर्षे शिक्षा झाली होती त्याच्या मदतीवर उद्धव ठाकरे मते मागत आहेत अशीही टीका मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ड. आशिष शेलार यांनी केली.

# निरीक्षक अजय कुमार बिष्ट यांनी केली अकोले तालुक्यातील मतदान केंद्रांची पाहणी

## मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या प्रशासनाला सूचना

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक अजय कुमार बिष्ट यांनी आज अकोले विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राना भेटी दिल्या. अकोले तहसील येथे आयोजित बैठकीत निवडणूक प्रक्रियेचा आढावा घेतला.

निवडणूक निरीक्षक अजय कुमार बिष्ट यांनी अकोले तालुक्यातील दुमाळवाडी, टाकळी, ढोकरी या गावातील मतदान केंद्रांवरील सोयी - सुविधांची पाहणी केली. त्यांनतर अकोले तहसील येथे आयोजित बैठकीत अकोले विधानसभा मतदारसंघातील निवडणूक तयारीचा आढावा घेतला. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील रहावे. असा सूचना यावेळी त्यांनी दिल्या. प्रशासनाने मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने केलेल्या तयारीचा त्यांनी यावेळी आढावा घेतला. अकोले प्रशासनाच्या निवडणूक तयारीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रामदास जगताप, अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सिध्दार्थ मोरे, संगमनेर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे आदी उपस्थित होते.

# जरांगे यांच्या त्या वक्तव्याने संपूर्ण राज्यात सत्ताधारी पक्षांना धडकी भरली

**अहमदनगर । प्रतिनिधी**

ज्यांना मराठ्यांनी सत्ता दिली, त्यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून देण्यासाठी आणि त्यांना आर्थिक, सामाजिक न्याय देण्याच्या कामी अडथळे आणले. अशा पुढाऱ्यांना असं पाडा की, त्यांच्या पाच पिढ्यात कोणीही उभं राहणार नाही. जरांगे यांच्या या वक्तव्याने संपूर्ण राज्यात सत्ताधारी पक्षांना धडकी भरली असून, संपूर्ण राज्याच्या कानाकोपऱ्यात मनोज जरांगे पाटलांचा जरांगे डिच्चू कावा पोहोचला असल्याचे लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

ओबीसी समाजामध्ये मराठ्यांना सहभागी करावे, अशी प्रमुख मागणी घेऊन महाराष्ट्रात उभे राहिलेल्या आंदोलनाचा वनवा पेटला. परंतु सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी मनोज जरांगे यांना व मराठा आंदोलकांना खेळवत ठेवले. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला फार मोठी संधी मिळालेली आहे, यातून मोठा संदेश देणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रसिध्दीपत्रकात म्हंटले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी कावा आणि डिच्चू कावा या दोन तंत्राचा वापर करून स्वराज्याची स्थापना केली. त्यांचा आदर्श समोर ठेऊन जरांगे यांनी हातात घेतलेला डिच्चू कावा तंत्र संपूर्ण राज्यात पोहोचला आहे. अहमदनगर दक्षिण मतदार संघात विखे यांना देखील जरांगे डिच्चू काव्याचा परिणाम भोगावा लागणार आहे. राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस आणि मुख्यमंत्री शिंदे यांना पाठीशी घालून मराठा आंदोलन मुसद्दीगिरीने मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दक्षिण मतदार संघात विखे कुटुंबाला जरांगे डिच्चू काव्याची भीती निर्माण झाली आहे. मराठा समाज ओबीसी मधील लोकांपेक्षा देखील आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या आहे. त्यामुळे या समाजाचे न्याय मागण्या गेल्या अनेक वर्ष सत्तेवर असलेल्या पुढाऱ्यांनी डावलल्या. त्यामुळे त्यांना कायमचा धडा शिकवला पाहिजे, असे या डिच्चू काव्यातून संदेश गेला असल्याचे ड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे. लोकभज्ञाक चळवळीचे ड. अनिल सरोदे, ड. संदीप वांढेकर, ड. बाळासाहेब पवार, ड. गवळी, ड. सुरेश लगड, अशोक सब्बन, ओम कदम, शाहीर कान्हू सुंबे, प्रकाश थोरात आदी कार्यकर्त्यांनी जरांगे डिच्चू कावा राज्यात व्यापक करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले आहेत. लोकांची भक्ती, लोकांचे प्रश्नांचे ज्ञान आणि लोकांचे प्रश्न खऱ्या अर्थाने सोडविण्याचे कार्य त्यातून देशातील संसदीय लोकशाहीचे रूपांतर लोकभज्ञाक संसदीय लोकशाहीमध्ये होऊ शकणार असल्याचे जारी करण्यात आले आहे.

## डीपी बोले तो..डेमोक्रेसी पार्टिसिपेशन उपक्रम प्रशंसनीय-जिल्हाधिकारी सालीमठ

# स्वीप समितीच्या मोबाईलला डीपी ,स्टेटस व रिंगटोन लावण्याच्या उपक्रमाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या निर्देशांनुसार अहमदनगर - शिर्डी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी) यांच्या संकल्पनेतून मोबाईलला डीपी , स्टेटस व रिंगटोन लावण्याच्या डीपी बोले तो.. डेमोक्रेसी पार्टिसिपेशन या उपक्रमाचे विमोचन जिल्हा आढावा बैठकीत श्री सालीमठ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आशिष येरेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी जि प ), डॉ. पंकज जावळे ( आयुक्त अहमदनगर मनपा ), भास्कर पाटील (शिक्षणाधिकारी) आदी मान्यवर उपस्थित होते

मोबाईलचा वापर सध्या मोठ्या प्रमाणावर केला जातो. डीपी ठेवणे ,स्टेटस बदलणे व विविध रिंगटोन लावणे या सामान्य माणसाच्या आवडत्या सवयी आहेत.या गोष्टीची औचित्य साधूनडीपी बोले तो.. डेमोक्रेसी पार्टिसिपेशन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रिंगटोन व कॉलर ट्यून लावण्यासाठी भारत निवडणूक आयोग यांचे हम भारत के मतदाता है व मुख्य निवडणूक अधिकारी - महाराष्ट्र यांचे ये पुढे ,मतदान कर ,लोकशाहीचा सन्मान कर ही दोन गीते क्यूआर कोड , लिंक , व ऑडिओ क्लिपच्या स्वरूपात अहमदनगरकरांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्याचबरोबर डीपी व स्टेटस ठेवण्यासाठी मी भारत आहे मी महाराष्ट्र आहे मी अहमदनगर आहे व मी मला मतदान करणार अशा

आशयाचे डिझाइन्स उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.ज्यांना डीपी , स्टेटस व गाणे हवे आहे त्यांनी देशातल्या पहिल्या अहमदनगर स्वीप केअर असलेल्या ९००२ १० ९००३ या व्हाट्सअप क्रमांकावर स्वतःचे संपूर्ण नाव पाठवावे.अहमदनगर जिल्हा स्वीप समितीचे उपक्रम देशात व राज्यात गौरवले जात आहेत अशा उपक्रमांच्या माध्यमातून निश्चितच मतदानाचे महत्त्व कळून मतदानाचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे. डीपी-स्टेटस यासारख्या घटकांमध्ये आपणास रस असतो. आपण इतरांचेही डीपी स्टेटस पाहतो. या वैशिष्ट्याचा या उपक्रमात निश्चितच फायदा होणार आहे .प्रशासनाची दोन्ही गाणी अत्यंत प्रेरणादायी आहेत . यांसारखे उपक्रम प्रशंसनीय व अनुकरणीय आहेत असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सालीमठ यांनी केले .उपक्रमासाठी राहुल पाटील(उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी ),मीना शिवगुंडे(स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी),आकाश दरेकर(स्वीप नोडल अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी),प्रदीप पाटील(तहसीलदार-निवडणूक),डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) , प्रशांत गोसावी (निवडणूक नायब तहसीलदार)व सर्व स्वीप समिती सदस्य आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे .

# देशाला नीलेश लंकेंची गरज,त्यांना दिल्लीला पाठवा-खा.सुप्रिया सुळे यांचे आवाहन

**भातकुडगांव । प्रतिनिधी**

एक सुसंस्कृत, कष्ट करणारा, तुमच्या आमच्या बरोबर असणारा अतिशय प्रेमळ लोकप्रतिनिधी म्हणून आपण त्यांना विधीमंडळात पाठविले. आता त्यांना दिल्लीला पाठवायचे असून देशाला नीलेश लंके यांची गरज असल्याचे खा. सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ शेवगांव तालुक्यातील भातकुडगांव येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेमध्ये सुप्रिया सुळे बोलत होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी राजेंद्र वळवी, वसंतराव चव्हाण, राजेंद्र आघाव, प्रताप ढाकणे, सुभाष लांडे, योगिता राजळे, ऋषीकेश ढाकणे, दत्तात्रेय फुंदे, शिवशंकर राजळे, समिर काझी, अशोक रोडे, वजीर पठाण, बाळासाहेब धोंडे, रामभाऊ साळवे, रामदास गोल्हार, राजेंद्र दौंड, बंडू रासने, सुभाष केकाण यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना सप्रिया सुळे म्हणाल्या, मत मागताना आपण कुणासाठी मते मागतोय हा देखील प्रश्न असतो. मला अभिमान वाटतोय की नीलेश लंके यांच्यासाठी मते मागण्याची संधी मला मिळाली. ही संधी दिल्याबद्दल मी इंडिया आघाडीला धन्यवाद देते. या सगळया निवडणुकीत आम्ही जी मेहनत घेतोय, कदाचित त्यापेक्षा जास्त मेहनत काँग्रेस आणि शिवसेना घेतेय हे मी गेल्या महिनाभरापासून अनुभवते असे सुळे म्हणाल्या.नीलेश लंके यांचा विजय निश्चित आहे.त्यांनी दिल्लीची बॅग भरून तिकीट लगेच बुक करावे असे मला वाटतंय असा विश्वास सुळे यांनी व्यक्त केला.

सुळे पुढे म्हणाल्या, अनेक आरोप, प्रत्यारोप झाले. आमच्याबद्दलही बोलतात. मी त्याची फार काळजी करत नाही. कारण आमचं मन साफ आहे. आम्ही कोणतीही गोष्ट कुणाचा अपमान करण्यासाठी करत नाही किंवा आणि आम्ही इतिहासातही रमत नाही.आरोप माझ्यावरही होतात. सन २००४,२०१८,२०२०मध्ये झाले. २००४ मध्ये झालेल्या गोष्टीला वीस वर्षे झाली. त्याचे उत्तर आज मिळाले तर कांद्याला भाव मिळणार आहे का, कापसाला भाव मिळणार आहे का ? देशातला भ्रष्टाचार कमी होणार आहे का ? महागाई कमी होणार आहे असे प्रश्न सुळे यांनी उपस्थित केले. नीलेश लंके यांची उमेदवारी निश्चित झाली त्याच दिवशी महाविकास आघाडीचा विजय झाला असे मी समजतो. ते सुप्रियाताई यांच्या खांद्याला खांदा लाऊन काम करतील असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त

केला.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले की,सामान्य माणसाला जगणे मुश्किल झाले आहे .खते अथवा शेतीची औजारे खरेदी करताना शेतकऱ्याला जीएसटी भरावा लागतो. काल परवा खतांच्या किमती वाढविण्यात आल्या. मोबाईल रिचार्जही वाढले. पायातल्या चप्पललाही जीएसटी द्यावा लागतो. भारतात गरीबांसाठी काही मोफत राहिलेले नाही. करामुळे सर्वांना प्रचंड त्रास होत आहे. सामान्य माणसाला जगणे मुश्किल झाले असल्याचे जयंत पाटील म्हणाले. नरेंद्र मोदी यांनी आमच्या पक्षावर भोपाळमध्ये टीका केली. पक्षावर टीका केल्याने आम्ही उत्तर देण्याची तयारी करीत होतो. मात्र चारच दिवसांत आमचे नउ जण शपथ घेउन मोकळे झाले. ४०, ४२ आमदारही गेले. परंतू मोदी यांनी अशी घोषणा केली नसती तर आमचा पक्ष स्वच्छ झाला नसता. त्यांचे आभार मानले पाहिजेत असे सांगत पक्ष सोडून गेलेले नेते व आमदारांवर जयंत पाटील यांनी तोफ डागली.आम्ही बऱ्याच गोष्टी ऐकतोय, आम्ही १०० कोटी खर्च करणार आहोत, १५० कोटी खर्च करणार आहोत. यंदा दिवाळीच्या जगोदरच दिवाळी दिसते आहे. बारामतीमधील सुप्रियाताईंचे अनुभव तुम्ही ऐकले. सर्व मुद्दे संपले, सगळं पायदळी तुडवलं, जनता साथ देण्यासाठी पुर्णपणे नकार देते त्यावेळी माणसाचा खिशाकडे हात जातो. प्रामणिकता, निष्ठा, तत्वाने चालणारी माणसं एकीकडे तर दुसरीकडे पैशांशिवाय दुसरे काहीच न दिसणारी सत्तेच्या शिवाय जगू न शकणारी एका बाजूला माणसं आहेत तरही विजय मात्र नीलेश लंके यांचाच असल्याचा दावा जयंत पाटील यांनी केला. नीलेश लंकेंसारख्या एका छोटया, साध्या, शेतकरी कुटूंबातल्या माणसाला पाडण्यासाठी इतकी माणसं दिल्लीवरून यावी लागली याच्यातच नीलेश लंकेंचा विजय आहे. नीलेश लंके यांना सगळे घाबरलेले आहेत. तुमच्या गोड हस्यामध्ये त्यांचा पराभव त्यांना दिसतोय. त्यांनी कितीही पैसा ओतला तरी नगर दक्षिणची जनता त्यांचा स्वाभिमान विकणार नाही. कुणाच्याही पराभवाखाली येणार नाही. जनतेचा माणूस दिल्लीला पाठविल्याशिवाय राहणार नाही असे जयंत पाटील म्हणाले. नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ खा. सुप्रियाताई सुळे यांची सभा पार पडली.

# सिएसटीपीएसच्या हद्दीतुन शहरात येणाऱ्या नाल्यांची सफाई करण्यास मनपा ला अडथळा निर्माण करु नका–आ.जोरगेवार

## सिएसटीपीएस ला सूचना, द्वारका नगरी येथील नाले सफाईची केली पाहणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

तुकुम प्रभागातील द्वारका नगरी येथील नाले सफाईच्या कामात सिएसटीपीएस प्रशासन अडथळा घालत असल्याची माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी येथील नाले सफाईच्या कामाची पाहणी केली असुन सिएसटीपीएसच्या हद्दीतुन शहरात येणा–या नाल्यांची सफाई करण्याची परवानगी मनपा प्रशासनला मिळवुन दिली आहे. त्यानंतर येथील मान्सून पूर्व नाले सफाई मोहिमेला गती मिळाली आहे. यावेळी वामन बुटले, प्रशांत भारती, दिलीप जमदाडे, जयंत गाडे यांच्यासह मनपा अधिकारी व स्थानिक नागरिकांची उपस्थिती होती.

मागच्या वर्षी चंद्रपूर शहराला पुराच्या पाण्याचा सामना करावा लागला होता. सोबतच अनेक भागात नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरले होते. या भागाची आमदार किशोर जोरगेवार यांनी पाहणी करत उपाययोजना केल्या होत्या. तुकुम येथील द्वारका नगरी या भागातही नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरल्याने पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. हा भाग सिएसटीपीएसच्या हद्दीलगत आहे. या भागातुन वाहणारा नाला हा सिएसटीपीएसच्या हद्दीतून नागरी वस्तीत येतो. दरम्यान मनपाची मान्सुनपुर्वी नाले सफाई मोहीम सुरु असतांना सिएसटीपीएसच्या हद्दीतील नाल्याची सफाई करण्याची परवानगी मनपा प्रशासनाला मिळत नव्हती. परिणामी यंदाही या भागात नाल्याचे पाणी शिरेल अशी भिती नागरिकांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्याकडे व्यक्त केली.

सदर बाब लक्षात येताच आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा प्रशासनाच्या अधिका–यांसह द्वारका नगरी येथे जात नाले सफाईच्या कामाची पाहणी केली. यावेळी सदर नाला हा सिएसटीपीएसच्या हद्दीत असल्याने तेथे सिएसटीपीएसच्या परवानगी शिवाय मनपा नाल्याची सफाई करु शकत नसल्याचे लक्षात आले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी लगेच सिएसटीपीएसचे मुख्य अभियंता गिरिश कुमरवार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत या भागात मनपा प्रशासनाला नाले सफाई करण्याची परवानगी देण्याच्या सुचना केल्या. त्यानंतर सदर परवाणगी मनपा प्रशासनाला देण्यात आली आहे. आता पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणारी झाडी झुडपी काढण्यात येत असून नाल्याचा मार्ग मोकळा करण्यात येणार आहे.

# कौसडी ग्रा.पं.ला महात्मा बसवेश्वर जयंतीचा पडला विसर

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी ग्रामपंचायत प्रशासनाला महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीचा विसर पडला असून ग्रामपंचायत कार्यालय मध्ये जयंती साजरी करण्यात आली नसल्यामुळे स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनावर समाज बांधवातून रोष व्यक्त केला जात आहे. आपल्या भारत देशाचा इतिहास खूप गौरवशाली आणि अभिमानस्पध आहे इतिहासात अनेक समाजसुधारक युगपुरुष क्रांतिकारक होऊन गेले. अश्या महापुरुषांमधील एक महापुरुष महात्मा बसवेश्वर यांची जयंती १० मे रोजी होती. या महापुरुषाची जयंती ग्रामपंचायत शासकीय कार्यालय मध्ये साजरी न करणे खूप मोठी शोकांतिका बाब आहे. संत महात्मा बसवेश्वर यांना १२ व्या शतकातील



आदर्श प्रशासक आणी समतेचे प्रेरणेते म्हणून ओळखले जाते माणूस हा त्यांच्या जन्माने नव्हे तर त्यांनी समाजात केलेल्या कार्याने मोठा होत असतो हा विचार मनाशी घट्ट धरून जात–पात काळधर्मांच्या भीती पाडून लिंगायत समाजाची मुहूर्तमेढ महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकामध्ये भारतीय समाज विशेष करून दक्षिण भारतातील समाज अनेक रूढी परंपरा अंधश्रद्धा कर्मकांड विष माता जातिवाद भेदभाव स्त्रियांची गुलामी अशा अनेक कारणांनी त्रस्त आणि मरगळलेला होता. संत महात्मा बसवेश्वर यांचा जन्म कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातील बालेवाडी येथे पशुपती शैव कुळात इसवी सन ११०५ मध्ये वैशाख शुद्ध तृतीय अक्षय तृतीया दिवशी झाला. महात्मा बसवेश्वर यांची जयंती अनेक ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. परंतु कौसडी सारख्या ग्रामपंचायत कार्यालयामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीचा विसर पडला आहे. जयंती साजरी न केल्यामुळे समाज बांधवांमधून स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनावर नाराजगी चे सूर निघत आहे.

> कौसडी ग्रामपंचायत कार्यालय मध्ये महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी न केल्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या विरोधात गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करून कारवाई करण्याची मागणी करणार.
>
> **मन्मथ बबनआप्पा गाढवे, कौसडी ता.जिंतूर.**

# राष्ट्रीय महामार्गावरील काटेरी झाडे, झुडपामूळे अपघाताला निमंत्रण

**मानवत । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग ६१ हा मानवत तालूक्यातील गावावरून गेलाअसल्याने मानवत तालूक्यातील नागरीकांना याचा फायदा झाला असल्यामूळे दळणवळण सोपे व जलद झाले आहे. राष्ट्रीय महामार्गावरील गावे आज रस्त्याच्या कडेवर वसली असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. महामार्गाचे नियम पाळा असा लाख मोलाचा संदेश देण्यात येत असून ही मात्र राष्ट्रीय महामार्गाच्या अभियंत्याचे राष्ट्रीय महामार्गाकडे दूर्लक्ष होत आहे. त्यामूळे आज घडीला साईट पट्यापर्यंत येड्या बाभळीने आपले हात पाय पसरले आहे. त्यामूळे अपघाताला अमत्रंण मिळत आहे.जिल्हाधिकारी साहेबांनी परभणी जिल्हातून जाणार्या राष्ट्रीय महामार्गावरील साईट पट्या व बाभळीच्या डोकावणारार्या फाद्यांकडे लक्ष द्यावे अशी मागणी सामान्य नागरीकातून होत आहे.

# महात्मा बसवेश्वर,भगवान परशुराम,छत्रपती संभाजी महाराज सर्वधर्मीय अभिवादन सोहळा संपन्न

**परभणी । प्रतिनिधी**

आज राष्ट्रजन फाउंडेशन परभणी आयोजित सर्वधर्मीय जयंती महोत्सव समिती परभणीच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती व भगवान परशुराम जयंती,राजे संभाजी महाराज जयंती तिन्ही जयंती महोत्सवाच्या निमित्ताने अभिवादन व पूजन सोहळा उघडा महादेव मंदिर समोर महात्मा बसवेश्वर चौक व संभाजी महाराज चौक येथे अभिवादन व पूजन सोहळा सर्व धर्मीय समाजाच्या प्रतिनिधीच्या उपस्थिती अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमास प्रतिष्ठ व्यापारी बंडू नाना सराफ,अँड.पवन निकम,राम कृष्णहरी अन्नदान छात्रालय अध्यक्ष गोविंद महाराज पौढे गुरुजी,शिव ह.भ. प वीरभद्र स्वामी,शिवलिंग आप्पा खापरे,स्वच्छता दूत कावळे मामा,प्राध्यापक डॉ.रमेश शिंदे, चंपालाल देवतवाल,जीवनआप्पा तरवडगे, माजी नगरसेवक रितेश जैन,सचिन पाटील,संतोष खराटे,सूर्यकांत मोगल,नितीन सावंत,सुधाकर गुरु कुलकर्णी,मंगेश भरकड,पिंटू काळे,किरण यादव, संभाजी गाजलवाड,अब्दुलभाई,रुग्णमित्र दिलीप बनकर कार्यक्रमाचे सर्व धर्मीय जयंती महोत्सव समिती अध्यक्ष डॉ.गोविंद कामटे सर्वधर्मीय जयंती महोत्सव कार्याध्यक्ष विठुगुरु वझुरकर,सर्वधर्मीय जयंती महोत्सव उपाध्यक्ष शेख सरफराज सर,सर्वधर्म जयंती महोत्सव

संस्थापक व आयोजक गोसेवक नितीनजाधव गोगलगावकर आधी जणांची उपस्थिती भव्यदिव्य सर्वधर्मीय अभिवादन करून सर्व धर्मांनी एकत्र यावं हीच याप्रसंगी आव्हान करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष विठूगुरु वझुरकर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयोजक गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.गोविंद कामटे यांनी केले यशस्वी साठी सर्वधर्मीय जयंती महोत्सव सर्व सदस्य व राष्ट्रजन फाउंडेशन ग्रुप उपस्थित होते विविध सर्व मान्यवरांच्या समाजाचे प्रतिनिधीचे स्वागत व सत्कार करण्यात आले सर्व भाविक भक्तांना उन्हाळ्याच्या गर्मीत थंड रसना वाटप करून जयंती साजरी करण्यात आली. अशी माहिती सर्वधर्मीय जयंती महोत्सव समिती अध्यक्ष तथा राष्ट्रजन फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली.

# पंकजाताई यांच्या प्रचारार्थ धारूर,वडवणी तालुक्या मध्ये केशवदादांचा झंजावती प्रचार दौरा संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील थेटेगव्हण,पहाडी पारगांव,पहाडी दहीफळ या डोंगर पट्ट्यातील गावामध्ये अक्षय तृतीयाच्या शुभमुहूर्तावर शुक्रवार दि.१० मे २०२४ रोजी बीड लोकसभा मतदारसंघाच्या भारतीय जनतापार्टी व महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या दौऱ्याला मतदारांचा उदंड प्रतिसाद.

या बाबत सविस्तर वृत्तांत असा की,माजलगाव विधानसभा मतदारसंघातील धारूर,वडवणी तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील गावांमध्ये माजी आमदार केशवराव आंधळे यांनी बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ नियोजित दौरा केला त्यादरम्यान ते म्हणाले की,पंकजाताई बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना पंकजाताईंनी राष्ट्रीय महामार्गासह,राज्यमार्ग,शासनाच्या वेगवेगळ्या योजना व पिकविमासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी त्यांनी मंजूर करून आणला,बीड जिल्ह्याच्या विकासाच व्हिजन असणाऱ्या नेत्या आहेत,सर्व जाती धर्माचे हीत पाहणाऱ्या आहेत,शेतकऱ्यांचे,ऊसतोड मजुरांचे,सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याचं काम त्या करतील पंकजाताई फक्त खासदार नाही

तर त्या मंत्री होणार आहेत बीड जिल्ह्याच्या विकासासाठी येणाऱ्या १३ तारखेला मतदान केंद्रावर जाऊन अनुक्रमांक एक असलेल्या पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या कमळ चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताईला प्रचंड बहुमताने विजयी करून दिल्लीला पाठवा असे त्यांनी मतदारांना आवाहन केले.

थेटेगव्हाण,पहाडी पारगाव,पहाडी दहिफळ या गावातील दौऱ्या दरम्यान माजी आमदार केशवराव आंधळे यांच्यासोबत वडवणी नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग बापू अंडील,भारतीय जनता पार्टीचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेवजी सावंत, यांच्यासह गावातील व तालुक्यातील भारतीय जनता पार्टी,शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,मनसे व घटक पक्षाचे तसेच वेगवेगळ्या समाजाचे मोठ्या संख्येने कार्यकर्ते या दौऱ्या दरम्यान उपस्थित होते या दौऱ्याला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

# महात्मा बसवेश्वेर महाराज व भगवान परशुराम यांच्या जयंती निमित्त निघालेल्या रॅलीचे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महात्मा बसवेश्वेर महाराज व भगवान परशुराम यांच्या जयंती निमित्त समाज बांधवांच्या वतीने शहरातून काढण्यात आलेल्या बाईक रॅली व शोभायात्रेचे गांधी चौक येथे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना शितपेयाचे वाटप करण्यात आले.

क्रांतिसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती लिंगायत समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त शहरातुन बाईक रॅली काढण्यात आली होती. तर भगवान परशुराम

यांची जयंती ही ब्राम्हण समाजाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या वतीनेही शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सहा वाजता सदर शोभायात्रा गांधी चौकात पोहचताच यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले. तर क्रांतिसुर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेचेही गांधी चौक येथे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .